**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपतींचं अभिभाषण विकसित भारताच्या संकल्पाला अधिक मजबूत करणारं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- भाडेपट्ट्यानं तसंच कब्जे हक्कानं दिलेल्या जमिनींचं रुपांतरण करताना कमी अधिमूल्य आकारण्याच्या अभय योजनेला मुदतवाढ

- मुंबई महानगरपालिकेचं आगामी आर्थिक वर्षासाठीचं शिलकी अंदाजपत्रक सादर

- सेन्सेक्समध्ये एकाच दिवसात सुमारे चौदाशे अंकांची तेजी, निर्देशांक पुन्हा ७८ हजारांच्या वर

**आणि**

- मुंबईत २४ कॅरेट सोन्याचे दर ८५ हजारांच्या उच्चांकी पातळीच्या पलीकडे

**<><><><><>**

राष्ट्रपतींचं अभिभाषण विकसित भारताच्या संकल्पाला अधिक मजबूत करणारं, नवा विश्वास निर्माण करणारं आणि जनतेला प्रेरणा देणारं होतं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्तावावरल्या चर्चेला उत्तर देताना ते आज लोकसभेत बोलत होते. गेल्या दहा वर्षात २५ कोटी नागरिक गरिबी रेषेच्या वर आले, या कार्यकाळात गरीबांना चार कोटी घरं मिळाली असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. गेल्या दहा वर्षात बारा कोटी घरांत शौचालय आणि बारा कोटी घरांना नळजोडणी दिली गेली याचा उल्लेखही

त्यांनी केला. आधीच्या सरकारच्या काळात निधीचा मोठा अपहार होत असल्याचं सांगत मोदींनी केंद्र सरकारची प्राथमिकता जनता आहे, असं सांगितलं. सरकारने योग्य लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवल्या असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट- नरेंद्र मोदी**

केंद्र सरकारच्या स्वच्छता अभियानाचा प्रधानमंत्र्यांनी आवर्जून उल्लेख केला. आयुष्मान योजनेमुळे जनतेची एक लाख वीस हजार कोटी रुपये बचत झाली, जनऔषधी केंद्रामुळे तीस हजार कोटी बचत होत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. मोफत अन्नधान्य योजना, मोफत वीज योजनेमुळेही जनतेची कोट्यवधींची बचत होत आहे, असं सांगून १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कर माफ केल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. पायाभूत सुविधांसाठी ११ लाख कोटी रुपये निधीची तरतूद केंद्र सरकारने केली असंही त्यांनी सांगितलं. देश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती करत आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी सांगितलं.  भारत डीपटेक क्षेत्रात पुढे जात आहे, आण्विक ऊर्जा क्षेत्र खुलं केलं आहे, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

प्रधानमंत्र्यांच्या भाषणानंतर लोकसभेनं राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभारप्रस्ताव स्वीकारला आणि कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

**<><><><><>**

कृषीविषयक योजनांमधे कोणतीही अनियमितता सहन केली जाणार नाही, तसंच प्रधानमंत्री पिक विमा योजनेत जर भ्रष्टाचार झाला असेल तर त्याची चौकशी केली जाईल, आणि दोषींवर कारवाई केली जाईल, असं आश्वासन कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज लोकसभेत दिलं. महाराष्ट्रात पिकविमा योजनेत गेल्या सरकारच्या काळात भ्रष्टाचार झाल्याचं वक्तव्य राज्याचे कृषी  मंत्री

शिवाजीराव कोकाटे आणि भाजपा आमदार सुरेश धस यांनी केल्याचं खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत सांगितलं. याबाबत सुळे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना चौहान बोलत होते.

महाराष्ट्र सरकारनं पिकविमा योजनेच्या सुधारणेसाठी पावलं उचलली आहेत, असंही चौहान म्हणाले. देशातल्या शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. सरकारनं २०१९ पासून उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा गृहित धरून किमान हमीभाव ठरवले आहेत, असं चौहान म्हणाले. नारळ उत्पादनात भारत जगात पहिल्या क्रमांकाचा देश बनल्याचा उल्लेखही यावेळी चौहान यांनी केला.

**<><><><>**

भाडेपट्ट्यानं तसंच कब्जे हक्कानं दिलेल्या जमिनींचं रुपांतरण करताना कमी अधिमूल्य आकरण्याच्या अभय योजनेला राज्य मंत्रीमंडळानं आज मुदत वाढ दिली. शेती, अकृषिक, निवासी, वाणिज्यिक अथवा औद्योगिक प्रयोजनासाठी तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या जमिनींच्या बाबत हा निर्णय लागू होईल. शासकीय भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरीत करताना कमी अधिमूल्य आकारण्यासाठी ही सवलत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आज ही बैठक झाली.

सातारा जिल्ह्यात कोयना जलाशयामध्ये बुडीत बंधारे बांधण्याच्या २५ प्रकल्पांसाठी १७० कोटी रूपयांच्या तरतूदींना विशेष बाब म्हणून मंत्रीमंडळानं प्रशासकीय मान्यता दिली. याशिवाय पुणे जिल्ह्यातल्या टेमघर प्रकल्पाच्या गळती प्रतिबंधक उपाययोजनेची उर्वरित कामे आणि धरण मजबुतीकरणाच्या कामांसाठी

३१५ कोटी ५ लाख रूपयांच्या खर्चालाही या बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेचं २०२५-२६ या वर्षासाठी ७४ हजार ४२७ कोटी रुपयांचं आणि ६० कोटी ६५ लाख रुपये शिलकीचं अंदाजपत्रक आज सादर झालं. मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी पालिका मुख्यालयात महापालिका आयुक्त, तसंच राज्य नियुक्त प्रशासक भूषण गगराणी, यांच्यापुढे ते सादर केलं. यंदाचा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या तुलनेत १४ हजार ४७२ कोटी ६६ लाख रुपयांनी वाढला आहे, तर शिल्लक रकमेत २ कोटी ४३ लाख रुपये वाढ झाली आहे. कोस्टल रोड, गोरेगाव मुलुंड लिंक रोड, वर्सोवा - दहिसर लिंक रोड ते मीरा भाईंदर पर्यंतचा उन्नत मार्ग या महत्त्वाकांक्षी नागरी वाहतूक प्रकल्पांचा या अर्थसंकल्पात समावेश आहे. मलनिःसारण प्रकल्पासाठी साडेपाच हजार कोटी, पाणीपुरवठा प्रकल्पासाठी चार हजार कोटी, पर्जन्य जलवाहिन्यांसाठी पाचहजार कोटी, अशी भरघोस तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

**<><><><><>**

गेल्या २ महिन्यात महावितरणनं ५३ हजारांहून अधिक सौर पंप बसवले आहेत. राज्य सरकारनं ‘मागेल त्याला सौर कृषी पंप योजने’अंतर्गत महावितरणला १०० दिवसात ५२ हजार ७०५ सौर पंप बसवण्याचं उद्दिष्ट दिलं होतं. १०० दिवसांचं काम महावितरणनं ६० दिवसात पूर्ण केल्याची माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली. सध्या राज्यात या योजनेअंतर्गत दीड लाखांहून अधिक सौर पंप बसवले आहेत. त्यातले सर्वाधिक

जालन्यात असून त्यानंतर बीड, अहिल्यानगर, परभणी, छत्रपती संभाजीनगर यांचा क्रमांक लागतो.

<><><><><>

गृह विभागाप्रमाणेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचेही नुकसान भरपाईसाठी कायमस्वरुपी धोरण तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहे. अवैध दारू विरोधी कारवाईत मृत्युमुखी पडलेले नाशिकमधले कर्मचारी कैलास कसबे यांच्या कुटुंबीयांना सरकारनं साडे ७ लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे. त्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिको आणि कॅनडावरचा कर एक महिन्यासाठी पुढे ढकलल्यामुळे आज आशियाई शेअर बाजारांमधे तेजी दिसून आली. त्याचा मोठा परिणाम भारतीय बाजारांमध्ये दिसून आला आणि सेन्सेक्स एकाच दिवसात सुमारे चौदाशे अंकांनी वधारला. गेल्या ४ सत्रात सेन्सेक्सनं ३ हजार २०० अंकांची तेजी नोंदवली आहे. दिवसअखेर आज सेन्सेक्स १ हजार ३९७ अंकांनी वाढून ७८ हजार ५८४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३७८ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ७३९ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

मुंबईत २४ कॅरेट सोन्याच्या किमती आज तोळ्यामागे पहिल्यांदाच ८५ हजाराच्या पलीकडे गेल्या. मुंबईत आज २४ कॅरेट सोन्याची किंमती प्रतितोळा ८५ हजार ५९३ रुपये होती. २२ कॅरेट सोनं ८३ हजार १०० रुपये तोळा दरानं मिळत होतं. मुंबईत चांदीचा दर मात्र गेल्या पाच दिवसांच्या तेजीनंतर आज काहीसा घसरून ९६ हजार ११२ रुपये प्रतिकिलो इतका झाला आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
४ फेब्रुवारी २०२५ -मंगळवार

**<><><><><>**

राज्यात सर्वत्र काल हवामान कोरडं होतं. मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत उल्लेखनीय वाढ झाली आहे. उर्वरित राज्यात किमान तापमान सरासरीच्या जवळपास राहिलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

//<><><><><>//